# अमरावती शहर दैनंदीन गुन्हे अहवाल दि. १८/०३/२०२३

दुखापतः–

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पोस्टे बडनेरा अप.क्र. २१०/२०२३ कलम ३२४, ५०४, ५०६ भादवि. | आठवडी बाजार नवी वस्ती बडनेरा | घटना ता.वेळ - दि.१७.०३.२०२३ चे १९.३० वा.<br><br>माहिती ता.वेळ दि.१७.०३.२०२३ चे २१.०० वा.<br><br>दाखल ता.वेळ दि.१७.०३.२०२३ चे २३.१५ वा. | सागर बाबुराव अंभोरे वय- २२ वर्ष रा. पवन नगर नवी वस्ती बडनेरा | राहुल सुरेश पंचारे वय- २० वर्ष रा. इंदिरा नगर नवी वस्ती बडनेरा | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे नातेवईक असुन गेल्या एका वर्षापासुन दोघांचा घरगुती कारणावरुन वाद होवुन भांडण झाले होते. नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी फि.हा भाजीपाला घेण्याकरिता गेला असता तेथे आरोपी हा आला व काही कारण नसतांना फि.सोबत भांडण करुन फिस थापडांनी मारहाण केली. व तेथील टपरीजवळील बँनरचा लोखंडी पाईप उचलुन फि.च्या डोक्याला मारला व फिस. शिवीगाळ करुन मारण्याची धमकि देवुन तेथुन निघुन गेला. अशा फि.च्या जबानी रिपोर्ट वरुन व मेडी.सर्टीवरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २. | वलगाव **103/2023** कलम ३२४,३२३, ५०६,३४ भादवि. | सतिनगर वलगाव | दि.१७/०३/२०२३ चे २१/०० वा. माहीती दि.१७/०३/२०२३ चे २२/३० वा. दाखल १७/०३/२०२३ चे २३/३० वा. | विक्की गजाननराव दाबेराव वय २८ वर्ष रा.सतिनगर वलगाव ता.जि.अमरावती. | १)गजानन महादेवराव सोळंके वय ५५ वर्ष २)श्रीकृष्ण महादेवराव सोळंके वय ४८ वर्ष ३)विशाल श्रीकृष्ण सोळंके वय २० वर्ष ४)जगदिस गजानन सोळंके वय १९ वर्ष सर्व रा.सति नगर वलगाव ता.जि.अमरावती. | हकिकत आशा प्रकारे आहे कि,नमुद घटना ता.वेळी व ठीकानी यातील फिर्यादी व आरोपि हे नात्याने एकमेकांचे नातेवाईक असुन ते एकाच मोहल्यात राहताता.यातील आरोपितांनी फिर्यादीस काठीने मारुन जखमी केले.फिर्यादिस आरोपितांनी जुण्या भांडणाच्या वादा वरुन काठीने मारुन जखमी केले.अशा फि.चे जबानी रिपोर्ट वरुन व डॉ.सा.यांचे मेडी.सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ३. | वलगाव **104/2023** कलम २९४, | वलगाव | दि.१७/०३/२०२३ चे २१/०० वा. | एक महिला | विक्की गजानन दाबेराव वय २८ वर्ष व गजानन नरशिंग दाबेराव | हकिकत अशा प्रकारे आहे कि,नमुद घटना ता.वेळी व ठीकानी यातील फिर्यादी व आरोपि हे नात्याने एकमेकांचे नातेवाईक असुन ते एकाच मोहल्यात राहताता.त्याचा जुण्या वादा वरुन भांडण झाले.आरोपिने फिर्यादिस घरात घुसुन फिर्यादिस अश्लिल भाषेत |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ४५२, ५०४ ,३२३,३४ भादवि. | | माहिती<br><br>१७/०३/२०२३ चे २२/४० वा. दाखल १७/०३/२०२३ चे २३/५१ वा. | | वय ५५ वर्ष दोन्ही रा.सति नगर वलगाव ता.जि.अमरावती. | शिवीगाळ केली व थापडा बुक्यानी मारहान केली. सदर फिर्यादीचे रिपोर्ट वरुन व डाँ.सा.यांचे मेडी सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल |

जबरी चोरीः—

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो.स्टे कोतवाली अप क्र.१२५/२३ कलम ३९२,३४ भादवी | **OPD** जवळील रुम जवळ जिल्हा सामान्य रुग्नालय अमरावती | घ.ता.वेळ दि. चे १७/०३/२०२३ चे १५.३० वा दरम्यान<br><br>दा.ता.वेळ दि.१७/०३/२०२३ चे १६.५५ वा | मंगेश ज्ञानेश्वरराव धाकडे वय ३५ वर्ष रा साईखेडा रतनपुर ता.चांदरबाजार जि अमरावती | १) शेख राजा शेख ईब्राहीम वय ३८ वर्ष रा ताजनगर अमरावती २.सैय्यद फैजान उर्फ छोटा रिचार्ज रा अमरावती | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील नमुद फिर्यादी हे तब्येत खराब असल्याने दि.१४/०३/२३ रोजी जिल्हा सामान्य रुग्नालय अमरावती उपचाराकरीता भरती झाले व आज दि.१७/०३/२३ रोजी वार्ड नं ०८ मधुन सुट्टी झाल्यावरुण घरी जाण्याकरीता बाहेर आले त्यावेळी फिर्यादीचे नातेवाईक सोबत नव्हते त्यांना यायला उशीर असल्यामुळे फिर्यादी नमुद घटना तावेळी जिल्हा सामान्य रुग्नालय अमरावती **OPD** जवळील रुम जवळ लोखंडी बाकळावर झोपलेले असतांना त्याचे जवळ नमुद आरोपी आले त्यांनी फिर्यादीचे खीशे चेक करत असतांना फिर्यादीला जाग आली फिर्यादीने हटकले असता त्यापैकी एकाने फिर्यादीचे गालावर चापटीने मारहान केली व दुसरा टकला असलेला आरोपी त्याने फिर्यादीस पकडुन ठेवले व दुस-याने फिर्यादीच्या मागच्या खिशात बळजबरीने खिशात हात टाकुन खिशातील पाकीट काढुन घेतले त्याच ७०० रु(५०० व २०० ची नोट) मोटर सायकलची चाबी , मोटर सायकलची आर.सी महाराष्ट्क बँकेचे दोन एटीएम कार्ड व इतर कागदपत्र होते व दोन्ही आरोपींनी मारहान करुन बडजबरीने पाकीट चोरुन जात आसतांना फिर्यादीने त्यांना अडविण्याचा प्रयत्न केला असता टकला असलेल्या इसमाने फिर्यादीजवळ असलेले व्हिओ कंपनीचा मोबाईल सुध्दा हिसकविण्याचा प्रयत्न केला मोबाईल खाली पडल्याने आरोपीला मोबाईल नेता आला नाही तसेच आरोपी पळुन जात असतांना ते एकमेकांना राजा व रिचार्ज या नावाने आवाज देत होते यांना सुरक्षा रक्षक जाकीर आणि अँम्ब्युलन्स चे चालकाने पकडण्याचा प्रयत्न केला पण आरोपी पळुन गेले अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन व डि ओ सा यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल |

चोरी:—

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| २ | नांदगाव पेठ अंप नं १०५/२३ कलम ३७९ भादवी | पोटे टाऊनशिप महाराष्ट्र बँक चे बाजुला | घ.ता.वेळ दि १-३-२०२३ चे दि १७-३-२३ चे ११-०० दरम्यान<br><br>दा.ता.वेळ दि १७-३-२३ चे १६-३५ वा | पांडुरंग दंविदास किरकिरे वय ३५ वर्ष रा पोटे टाऊनशिप महाराष्ट्र बँक जवळ | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फि यानी पोस्टेला तक्रार दिली कि त्याचे स्वताचे पोसणीचे गोरा व कारवड सन २०२१ मध्ये घरा बाजुला बांधलेला असता दोर तोडुन निघुन गेले किवा कसे या बाबत जवळ असलेल्या महाराष्ट्र बँक येथील फुटेल पाहुन शोध घेम्या बाबत अर्ज दिला होता परंतु तसाच प्रकार दि १-३- २३ ला दरम्यान त्याची भुरकट रंगाची गाय कि अं ७००० रु ची व आठ दिवसाची लहान वासरु काळा भुरकट रंगाचा कि अं ३००० रु असा एकुन १०,००० रु किं गाय व वासर अज्ञात चोराने चोरुन गेल्याचे फि याचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

वाहण चोरी :—

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>______<br>अप क्र | पदम सौरभ कॉलनी अमरावती | दि १६-०३-२३ चे १३.३३ वा दरम्यान<br>दि १७-०३-२३ चे १७.१० | युवराज अशोकराव जाधव वय ४२ वर्ष रा धुंदी ता पुसद जि यवतमाळ ह मु | अज्ञात इसम | यातील हकीकत अश्याप्रकारे आहे की नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे पदम सौरभ कॉलनी येथे भाड्याने राहत असुन नमुद घ ता वेळी व ठिकाणी फिर्यादी यांच्या पत्नीने फोन करुन सांगितले की आपल्या मुलाने घराचे कंम्पाऊंड मध्ये ठेवलेली रेंजर सायकल हायड्रन मॅड शार्क कंपनीची काळया हिरव्या रंगाची निळया पट्टयाची २९ इंची अलाम फ्रेम २१ स्पीड किं अं ८००० रु ची कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली.अशा फि चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ३६६/२३ कलम ३७९ भादवि | | वा | पी टी नारखेडे पदम सौरभ कॉलनी अमरावती | | |

अपघात :—

| अ.क्र. | पो.ठाणे<br>गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ<br>माहीती ता वेळ<br>गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | जखमीचे नांव | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ९ | १२ |
| १ | पोस्टे बडनेरा अप.क्र.२०७/२३ कलम २७९, ३३७, ३३८ भा.दं.वि. | बगिया टी पाईन्ट कोंडेश्वर रोड बडनेरा अमरावती | घटना ता.वेळ - दि.२८.०१.२०२३ चे १७.३० वा. ते १७.४५ वा. माहिति ता.वेळ - दि.१७.०३.२०२३ चे १६.४५ वा. दाखल ता.वेळ - दि. | मोहन प्रल्हादाराव खडे वय- ४८ वर्ष रा. माळीपुरा खोलापुरी गेट अमरावती | ट्रक क्र.MH२७ C३९६ चा चालक नामे मुकेश सदावर्ते वय- ५५ वर्ष रा. माया नगर राजापेठ अमरावती | रुषिकेश मोहन खडे वय- १९ वर्ष रा. . माळीपुरा खोलापुरी गेट अमरावती<br>२) आयुष प्रदीप सायसीकमल वय- १८ वर्ष रा. . माळीपुरा खोलापुरी गेट अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फि.यांचा मुलगा व त्याचा मित्र हे दोघे त्यांची मो.सा.क्र.MH२७BN२४५२ ने राममेघे कॉलेज येथुन कॉलेज सुटल्यानंतर घरी येत असतांना त्यांचा नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी ट्रक क्र.MH२७C३९६ ने अपघात झाला वरुन त्या ट्रक चालकाने त्यांना इलाजा करिता रिम्स हॉस्पीटल येथे भर्ती केले व नंतर फि.च्या मुलाने फोन द्वारे सांगितले वरुन फि.हे हॉस्पीटल ला गेले त्यावेळेस नमुद ट्रक चालक हा तेथे हजर होता.त्याने त्याचे नाव गाव मुकेश सदावर्ते वय- ५५ वर्ष रा. माया नगर राजापेठ अमरावती असे सांगितले व इलाजाचे पैसे देतो असे सुध्दा म्हटले व तो तेथुन निघुन गेला व परत आला नाही. तेव्हा फि.च्या मुलाने सांगितले की, आम्ही कॉलेज सुटल्यावर घरी अमरावती कडे येत असतांना नमुद ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक चे इंडिगेटर न दाखवता ट्रक टर्न केला त्यामुळे फि.च्या मुलाचे गाडीवरील नीयंत्रण सुटले व गाडी खाली पडले व दोघांचे पाय गाडीच्या समोरच्या चाकात गेले वरुन दोघांवर रिम्स हॉस्पीटल येथे उपचार सुरु होता. त्यामुळे रिपोर्ट देण्यास येवु शकलो नाही. अशा जबानी रिपोर्ट वरुन व मेडी.सर्टी.वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १७.०३.२०२३ चे १७.२७ वा. | | | | |
| २ | नांदगाव पेठ अंप नं १०६/२०२३ कलम २७९, ४२७ भादवी | टोलनाका नांदगावपेठ | घ.ता.वेळ १७-३-२३ चे ०६-३६ वा<br><br>दाखल ता वेळ दि १७-३-२३ चे २०-०५ वा | पांडुरंग तुकाराम गाडगे वय ३५ वर्ष रा धोरवाडी ता कंडवा जि सातारा | महिन्दा् एक्सक्यु व्ही ५०० कंम्पनीचे सिलव्हर रंगाची फोर व्हिलर गाडी | | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातील नमुद घता वेळी वठकाणी यातील फि हे नांदगावपेठ टोलनाका येथे शिफ्ट ईचार्ज म्हणुन काम पाहतात आज रोजी दि १७-३-२३ रोजी चे सकाळी ०६-३६ नागपुर कडुन अमरावती कडे जाणारी महिन्दा् एक्सक्यु व्ही ५०० कंम्पनीचे सिलव्हर रंगाची काचेला काळी फ्रेम असलेलली नंबर दिसुन आला नाही अशा वर्णमाची फोर व्हिलर गाडी भरधाव वेगाने व निष्यकाळजीपणाने टोलवर न थांबता टोल बॅरेल तोडुन पळुन गेला व टोलचे मुकसान केले अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

इतर :—

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | धटनास्थळ | गुन्हा घडला ता.वेळ माहीती ता वेळ गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १२ |
| १ | पोस्टे बडनेरा अप.क्र. २०९/२३ कलम १३५ भा.वि.का. | बिलाल नगर अमरावती | घटना ता.वेळ - दि.०५.०९.२०२२ चे १२.१० वा. माहिती ता.वेळ - दि.१७.०३. | अंकुश बाबाराव पटेल वय- ३२ वर्ष नोकरी- सहायक अभियंता गुणनियंत्रण अमरावती | मोहम्मद तन्वीर सोहेल मोहम्मद झाकीर वय- ४५ वर्ष रा. बिलाल नगर अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की फिर्यादी हे वि.वि. केन्द्र गुणनियंत्रण अमरावती शहर म.रा.वि.वि.क मर्या येते सहायक अभियंता या पदावर नेमणुकीस असुन नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी त्यांच्यास्टाफसह वीजचोरी मोहीम अंतर्गत वीज चोरी पकडण्याकरीता गेले असता आरोपीने त्यांच्या घरात मीटर मध्ये छेडछाड केल्याचे दिसुन आले त्यानुसार महाविरतणाच्या मीटर मध्ये लाल रंगाची वायर कट करुन महावितरणचे ४८९४ युनिटचे रक्कम ८२७३०/- रु. रु चे किमंतीची वीज चोरी केली सदर गुन्हयातील जप्त मुदेमाल पोस्टे ला जमा केला आहे.अशा फिचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | २०२३ चे २१.०० वा. दाखल ता.वेळ - दि.१७.०३. २०२३ चे २२.४८ वा. | शहर | | |
| २ | बडनेरा अप क्र. २०८/२०२३ कलम २९४, ५०६, ३४ | बडनेरा रोड चैन वाईन बार अँन्ड रेस्टॉरेन्ट | घटना ता.वेळ - दि.१७.०३. २०२३ चे ००.३० वा. माहित ता.वेळ - दि.१७.०३. २०२३ २०.४५ वा. दाखल ता.वेळ - दि.१७.०३. २०२३ चे २१.३० वा. | घनश्याम दौलतराम रामरखियानी वय- ४४ वर्ष व्यसाय हॉटेल चालविणे रा. सिंधी कँम्प अमरावती | अशोक उर्फ पिंटु वरसे वय- ४० वर्ष रा. गोपाल नगर कुंभारवाडा राजापेठ अमरावती अधिक ०३ मित्र नाव माहित नाही. | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी यातील आरोपी व त्याचे ०२ ते०३ मित्र असे फि.चे हॉटेल मधुन दारु पिवुन परत जात असतांना त्यांना फि.ने बिल मागितले असता आरोपीतांनी फिर्यादीस तु मला ओळखत नाही का. असे बोलुन फिर्यादीला अश्लील भाषेत शिवीगाळ केली. व मारण्याची धमकी दिली. नंतर हॉटेल बाहेर झालेले बिल २६७५/- रु. न देता निघुन बाहेर आले व बाहेरुन सुध्दा शिवीगाळ केली. व हॉटेल मध्ये बसलेले एका गि-हायीकाकडुन आरोपीचे फिर्यादीला नाव माहित पडले वरुन त्यांनी पोस्टे ला येवुन तक्रार दिली. अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | भातकुली 62/23 कलम 283 भादवी | भातकुली ते आसरा आमरोड वर भातकुली बसस्टॉप | दि. 17/03/2 02 चे16.30 ते 17.00 वाजता दाखल - | सरतर्फे नापोकाँ लक्ष्मण खंडारे ब नं 995 पोस्टे भातकुली | मंगेश सुखदेव काळे वय 43 वर्ष रा. हरतोटी भातकुली | हकिकत अशा प्रकारे आहे की, आम्ही नापोकाँ लक्ष्मण खंडारे ब नं 995 पो.काँ 989 असे पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता भातकुली बसस्टॉप आमरोडवर आरोपी याने आपले ताब्यातील तिनचाकी प्रवासी ऑटो क्रं MH-27AF -3367 हे वाहन रहदारी अडथळा निर्माण होईल व मानवी जिवीतास धोका निर्माण होईल अशा बेताने आमरोडवर उभे करुन मिळुन आल्याणे त्याचे विरुध्द सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 17/03/202 चे 17.23 | | | |

मर्ग खबरी :–

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | घटनास्थळ | मर्ग घडला ता.वेळ | मरणाचे कारण | दाखल ता वेळ | फिर्यादी | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | १२ |
| २ | बडनेरा मर्ग क्र.२०/२०२३ कलम१७४ जाफौ | शर्मा यांचे पडीत शेत ग्राम दाभा ते निंभोरा रोड | दि १७-३-२३ चे १४-०० वा ते १४.३० वा | विहीरीत पाण्यात बुडुन मुत्यु | दाखल.ता.वेळ दि १७-३-२३ चे २३-०५ | शिशुपाल रामलाल कुशवाह वय-४४ वर्ष रा. शर्मा यांचे पडीत शेत ग्राम दाभा ते निंभोरा रोड | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फि.यांचा नातेवाईक वय १७ वर्ष हा पेपर देवुन १४.०० वा. घरी आला व फि. हे शेतात कामाला गेले होते. नंदकिशोर कुशवाह याने फि. यांचे नातेवाईकास म्हटले की, तु माझ्या घरी फोन का करतो वरुन फि.च्या नातेवाईकाने बागेतील विहीरीत उडी मारली अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल |
| ३ | नांदगाव पेठ मर्ग नं ०९/२०२३ कलम १७४ जा फौ | गजानन ईन्डट्रीज नांदगावपेठ एम आय डि सी प्लॉंट क्र अ/६६ | घ.तावेळ दि १७-३-२३ चे ११-०० वा | कुटारवरुन पाय घसरुन मशिनच्या पट्यात पाय गेला गंभार जखमी होवुन मरण पावला | दाखल.ता.वेळ दि १७-३-२३ चे १९-०२ | मुस्लिम खाम पप्पु खान वय २५ वर्ष रा हजरतपुरा ता दातागंज जि बदायु (यु पी) ह मु एम आय डि सी प्लॉंट क्र अ/६६ | हकिकत असा प्रकारे आहे कि यातील फि व मृतक वय १६ वर्ष हे नातेवाईक आहे व फिर्यादी हे एम आय डि सी येथे कंपनीत काम करत होता परतु मृतक हा काम करत नव्हता पण कंपनीचे रुम सोबत राहत होता घ.तावेळी व टिकाणी फि दि १७-३-२३ रोजी सकाळी १०-०० वा दरम्यान मी ज्या मशिनवर काम करतो ती मशीन खराब झाल्याने मी रुमवर परत आलो व मृतकहा ११-०० वा दरम्यान आमचो सोबत काम करणारा शाहरुख यास चहा देमे करिता तो त्या ठिकाणी गेला चहा देत असताना अचानक त्याच पाय कुटारा वरुन घसरुन कनव्हर मशिनचे पट्यात गेला त्यामुळे तो गंबीर जखमी झाला त्यामुळे तो मरण पावला अशा फि यार्चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल |

जुगार:—

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १ | पो.स्टे. बडनेरा | अप.क्र.२०६/२०२३ कलम १२(अ) मजुका सहकलम १०९ भा.दं.वि. | आठवडी बाजार सब्जी मार्केट बडनेरा | दि.१७.०३.२०३ चे १३.३० वा. ते १४.३० वा. | दि.१७.०३.२०३ चे १६.२९ वा. | सरतर्फे पोहेका सतिष भाऊराव देशमुख बनं. १२२२ गुन्हे शाखा अमरावती शहर | १)गजानन पांडुरंग पवार वय- ४५ वर्ष रा.लोणी अमरावती २) गुणवंत उदयभान भालेकर वय- ५८ वर्ष रा.सार्शी लोणी अमरावती ३) सचिन नामदेवराव आठवले वय- ४२ वर्ष रा. नवी वस्ती बडनेरा ४) नासीर अहेमद निसार अहेमद रा. बडनेरा | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी फि.यांनी वरली मटका चालवणारे इसमांना चिठ्यासह पोलीस अंमलदाराच्या मदतीने जागीच पकडले व त्यांची अंगझडती घेवुन त्यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव वरील प्रमाणे सांगितले व त्यांचे जवळ वर नमुद माल व वरली मटका चिठ्या लिहलेले मिळुन आल्याने पंचासमक्ष जप्त करुन सदरचा गुन्हा दाखल |

प्रोव्हीशन रेड :—

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १. | पोस्टे राजापेठ | अप क्र. २७९/२३ कलम ६५ (ई) म.दा. का. | म.न.पा. झोन क्र. ३ हमालपुरा अमरावती | दि. १७/३/२३ चे २०-३० वा. | दा. ता. वेळ - दि. १७/०३/२३ चे २२.०६ वा | सर तर्फे परि. पो. उप. नि. सागर ठाकरे पो. स्टे. राजापेठ अमरावती शहर | गजानन पुंडलिक धनवे वय ५३ वर्ष रा. म.न.पा. झोन क्र. ३ हमालपुरा | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी गुप्त बातमीव्दाराव्दारे खात्रीलायक बातमीवरून पंचासमक्ष यातील आरोपी हा लोकांना जमा करून अवैध्दरित्या दारू विक्री करित असतांना मिळुन आला वरून त्याचे ताब्यातुन १४ नग देशी दारू बॉंबी संत्रा १८० मिली चे कि. अं. ९८०/- रू. चा मालमिळुन आल्याने नमुद आरोपी विरूध्द सदरचा गुन्हा दाखल |